# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ३०/०४/२०२३ (रविवार)

---

## दुखापत

पोलीस स्टेशन रामटेक :– अंतर्गत मौजा महादुला रामटेक १४ किमी पुर्व. दिनांक २८/०४/२३ चे २०.३० ते २०.४० वा दरम्यान, फिर्यादि व फिर्यादि चा भाउ यांना आरोपी नामे– १. वैभव सुखदेव काठोके २.हर्षल सुखदेव काठोके ३. सुखदेव डुलीचंद काठोके सर्व रा महादुला रामटेक यांनी **संगनमत** करून **शेतीच्या वादाच्या कारणा वरून** वाद करून काठी ने मारून शिवीगाळ करून मारण्याची घमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– लक्ष्मीनारायण रामचंद्र हारोडे वय ४३ वर्ष रा. हनूमान मंदिर चौक महादुला रामटेक मोनं/ ९७६३९५२०१५ यांचे रिपोर्टवरुन पोस्टे रामटेक येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६, ३४ भादवि चा गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो ना /उमेश गाढवे पोस्टे रामटेक मो नं/ ९८२२६१०८०२ हे करीत आहे.

## अपघातात जखमी

पोलीस स्टेशन पारशिवनी :– अंतर्गत मौजा पारशिवनी ते खापरखेडा रोड अमन हॉल समोर पारशिवनी ०१ किमी दक्षिण, दिनांक २८/०४/२३ चे २१/१५ वा दरम्यान , यातील मोटर सायकल .क्र. एम.एच.४९ बि. पी. ३०३७ चा चालक जखमी नामे –अमोल विलास वैघ्य वय ३० वर्ष रा. पारशिवनी याने आपले ताब्यातील मोटर सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन दारूचे नशेत खापरखेडा वरून पारशिवनी कडे येत असता उभ्या ट्रक क्र. सी. जी. १३.ए .बी. ९५११ ला मागुन धडक देवुन स्वता जखमी होण्यास कारणीभुत ठरला,

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शेषराव गुंडेराव काकडे वय ५२ वर्षे रा. ईटगाव ह. मु. पारशिवनी खापरखेडा रोड अमन हॉल समोर पारशिवनी यांचे रिपोर्टवरुन पोस्टे पारशिवनी येथे कलम २७९, ३३७ भादवी. सहकलम १८४, १८५ मोटर वाहन कायदा प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा. वंदना पो.स्टे. पारशिवनी मो.क्र. ७३८५४१९७१२ हे करीत आहे.